**मागासवर्गीय मुला/मुलींकरिता मॅट्रीकपूर्व शिक्षण फी, परिक्षा फी योजना या योजनेस महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे नांव देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : इबीसी-२०१६/प्र.क्र.६२७/शिक्षण-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ फेब्रुवारी, २०१८

**<u>वाचा</u> :** १) शासन निर्णय, शिक्षण क्रिडा व समाज कल्याण विभाग, क्र.इबीसी-१०६८/८३४६७/जे, दिनांक २४.१२.१९७०
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.एफईडी-१०९६/प्र.क्र.१९७८/९६/साशि-५, दिनांक १३.०६.१९९६
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र.एफईडी-२०००/(१२१/२०००)/माशि-८, दिनांक १५.११.२०००
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र.एसएसएन-२१०३/(५०/०३)/माशि-२, दिनांक २७.०५.२००३
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र.पीआरई-२००३/(३५२६)/प्राशि-१, दिनांक २८.०५.२००३
६) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.इबीसी-२०११/प्र.क्र.९७/ शिक्षण-१, दिनांक ३०.१२.२०११

**<u>प्रस्तावना</u> :**

सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना, निवासी शाळा योजना इत्यादी योजना राबविण्यात येतात. सदरील योजना ह्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचा भाग असल्याने, समाजाला या थोर समाज सुधारकाची महती कळावी आणि खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली देण्याच्या दृष्टीने, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नांवाने योजना जाहिर करण्याची, लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेऊन या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय मुलां/मुलींकरिता मॅट्रिकपूर्व शिक्षण फी, परिक्षा फी योजनेस महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे नांव देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १० वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील दारिद्य रेषेखालील कुटुंबातील

विद्यार्थ्यांकरिता सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणारी **“मागासवर्गीय मुला/मुलींकरिता मॅट्रीकपूर्व शिक्षण फी, परिक्षा फी”** ही योजना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून **“महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मागासवर्गीय मुलां/मुलींकरिता मॅट्रिकपूर्व शिक्षण फी, परिक्षा फी योजना”** या नांवाने संबोधण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. तद्नुषंगाने सर्व संबंधित विभाग/कार्यालयांनी या योजनेच्या नांवात वरीलप्रमाणे सुधारणा करुन सुधारीत नांवाने योजनेची प्रसिध्दी व प्रभावी अंमलबजावणीची कार्यवाही करावी तसेच, याबाबत त्यांच्या अधिनस्त कार्यालयांनाही आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

३. सदरहु योजनेच्या अंमलबजावणीकरिता यापूर्वीच्या शासन निर्णयांन्वये विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्ती पुढील आदेश होईपर्यंत कायम राहतील.

४. सदर योजनेच्या अंमलबजावणीवरील खर्च या योजनेकरिता असलेल्या खालील लेखाशिर्षाखाली त्या-त्या चालू आर्थिक वर्षाकरिता मंजूर निधीतून करण्यात यावा :-

(१) मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासप्रवर्गाचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७ शिक्षण, पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०४) (११) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व शिक्षणासाठी शिक्षण व परिक्षा फी ची प्रदाने (विघयो) (२२२५ ०४४१)

(२) मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासप्रवर्गाचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७ शिक्षण, पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, (०८) (०२) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण व परिक्षा फी साठी अनुदान (विघयो) (२२२५ ०५४८), ३१ सहायक अनुदान (वेतनेत्तर)

(३) मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासप्रवर्गाचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७ शिक्षण, (०८) जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदान, पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, (०८) (०३) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना, माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परीक्षा फी साठी अनुदाने (विघयो) (२२२५ ३८४१), ३१-सहायक अनुदान (वेतनेत्तर)

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०२१५१६१५०५१२२२ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2018.02.15 16:21:36 +05'30'

**(दि.रा.डिंगळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (सा.न्या.व वि.स.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा.विधान परिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई
६) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७) अमुस, प्रधान सचिव, सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
९) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३) सर्व विभागीय उपायुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य
१४) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१५) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक/उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य
१६) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेय/लेखा परिक्षा) महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर.
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१९) सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य.
२०) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सर्व कार्यासन
२१) निवडनस्ती (का.शिक्षण-१)